अहंकार हा माणसाच्या प्रगतीचा मोठा शत्रू आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार २५ मार्च २०२५ | अंक १०४ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






# औरंगजेबाची कबर फोकसला त्यांनीच आणली

## जरांगे पाटील यांचा सर्वात मोठा आरोप

### आम्हाला खाक केलं

**त्यांना मराठ्यांची नस कळली आहे. मारामाऱ्या करण्यासाठी त्यांनी मराठ्यांना ठेवलं आहे. यांनी आमचा खूप वापर केला. आमच्या लेकरांनी मारामाऱ्या करायच्या आणि मलिदा यांनी खायचा सुरू आहे. त्यामुळे मराठ्यांचं वाटोळं झालं. ७०-७५ वर्ष यांनी मराठ्यांचा भांडणासाठी वापर केला. ते फक्त उकरून काढतात आणि भांडणं लावून मोकळे होतात. या राजकारणामुळे आमच्या समाजाची लेकरं खाक झाली. आम्हाला शिक्षण दिलं नाही, नोकरी दिली नाही. आम्हाला खाक केलं, असा हल्ला जरांगे यांनी चढवला.**

### मराठा सेवक म्हणून काम करेल

**आज अंतरवली सराटीत मराठा समाजाची बैठक आहे. त्याची माहितीही त्यांनी दिली. बैठकीला महाराष्ट्रातील मराठा सेवक बोलावले नाही. हा बैठकीचा पहिला टप्पा आहे. गोरगरीबांचे कामे करण्यासाठी, अडीअडचणी जाणून घेण्यासाठी कोणी तरी गावात एक मुलगा पाहिजे, तो नियुक्त करायचा आहे. आपण सेवक म्हणून काम करणार आहोत. नोकर म्हणून काम करणार आहोत. समाजाची सेवा करण्यात मोठेपण आहे. याची जबाबदारी एकावर असली पाहिजे. पूर्ण गाव आमचं एक आहे. पण काम करायला कोणी नाही. त्यामुळे आलेल्या अडीअडचणी सांगायच्या कुणाला? त्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. आमची गोष्ट राज्यातील सर्व गावांना कळली पाहिजे आणि तिकडची गोष्ट आम्हाला कळली पाहिजे.**

मुघल बादशाह औरंगजेबाच्या कबरीवरून राज्यात मोठा वाद निर्माण झाला आहे. ही कबर हटवण्यासाठी राज्यात ठिकठिकाणी आंदोलन होत आहेत. नागपूरमध्ये तर या कबरीच्या मुद्द्यावरून दोन गट आपआपसात भिडले. त्यामुळे नागपूरची परिस्थिती चिघळली. या घटना ताज्या असतानाच मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची मोठी प्रतिक्रिया समोर आली आहे. सरकारलाच औरंगजेबाची कबर हटवायची नाहीये. सरकारला कबर हटवायची असती तर त्यांनी तिथे पोलिसांचं संरक्षण दिलंच नसतं, असा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. मीडियाशी संवाद साधताना जरांगे पाटील यांनी हा दावा केला आहे. सरकारलाच औरंगजेबाची कबर काढायचीच नाही. त्यांनीच कबर फोकसला आणली. ते डबडं कुठं पुरून ठेवलंय हे कुणालाच माहीत नव्हतं. त्यांनी उलट माहिती करून दिली. औरंगजेबला फोकसमध्ये आणलं.सरकारला कबर काढायचीच नाही. काढायची असती तर त्यांनी पोलीस संरक्षण नसतं लावलं. त्यांना फायद्यासाठी लढायचं आहे, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. मराठा सेवक नियुक्त केला तरी तो सर्व जातीधर्माच्या समस्या सोडवणार आहे. म्हणून पहिल्या टप्प्यात वीस एक तालुक्त्यातील लोकांना बोलावलं आहे. महाराष्ट्रासाठीची बैठक असती तर रानात मंडप घातला असता. बैठकीला बसल्यावर आरक्षणाचा विषय निघेल. पक्ष नाही, संघटना नाही. आम्ही सात कोटी एकत्र आलोय. कशाला पाहिजे संघटना आणि पक्ष. गरज नाही. समाजच बलाढ्य आहे. फक्त समाजाच्या हाताखाली अडीअडचणी जाणून घेण्यासाठी एखादं पोरगं पाहिजे. म्हणून आम्ही बैठक घेतली आहे. ही निर्णायक बैठक नाही. जुनी पोस्ट पोरांनी व्हायरल केली आहे. एका गावातून एक एका मुलाला बोलावलं. एकूण आठ टप्प्यात बैठका होणार आहे. राज्यातील लोकांना एक एका टप्प्यात बोलावलं जाणार आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

# ऊसतोडणी मजूर परतू लागल्याने गावे गजबूजू लागले !

यावर्षी सारवर कारखान्यांचे गळीत हंगाम लवकरच संपल्याने आता ऊसतोडणी मजूर परतले आहेत.त्यामुळे गावे गजबुज लागली. झाली तोडणी ऊसाची, धरली वाट घराची, असे चित्र सध्या पाहावयास मिळत आहे. यावर्षी झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमुळे गळीत हंगाम उशिरा सुरू झाला. दरम्यान, अनेक मजूर राज्यातील कारखाने सुरू होण्याची वाट न पाहता राज्याबाहेर गेले होते. काही कामगारांनी दिवाळी व निवडणुकीत मतदान करून ऑक्टोबर महिन्यात कारखान्याचा रस्ता धरला. मात्र, उशिरा सुरू झालेले हंगाम लवकर संपल्याने अनेक कारखाने बंद झाले आहेत. पट्टा पडल्याने अनेक मजूर आपापल्या गावांकडे रवाना होताना दिसत आहेत. बीड तालुक्यातील, पिंपळनेर सह परिसरातून अनेक मजूर व छोटे शेतकरी उचल घेऊन ऊस तोडायला जातात. चार महिने हंगाम चालतो. त्यानंतर हे मजूर गावाकडे येतात. गेल्यावर्षी ऊसलागवड कमी असल्याने यंदा हंगाम लवकर संपले. ग्रामीण बाजारपेठा ओस-ग्रामीण बाजारपेठा ओस-ग्रामीण बाजारपेठा ओस-ग्रामीण बाजारपेठा ओस-ग्रामीण बाजारपेठा ओस ऊसतोडणी मजूर कारखान्यावर गेल्याने तीन-चार महिने वाड्या-वस्त्यांवर शुकशुकाट असतो. वृद्ध मुलेबाळे, घर राखणीला असतात. दुसरीकडे गावालगतचा परिसर ऊसतोडणी मजुरांनी गजबजलेला असतो. आता मजूर परतू लागल्याने ग्रामीण भागात बाजारपेठा भरू लागल्या आहेत. ऑगस्ट महिन्या पासूनच कामगारांना उचल देऊन कोयते ठरवले जाते. दसऱ्याला मजूर कारखान्यावर जातात. मजुरांचे वर्षभराचे आर्थिक गणित, देणेघेणे, लग्नकार्य आधी कामे उचलीच्या पैशावर उरकली जातात. सणउत्सवही उसाच्या फडातच साजरे केले जातात. ऊसतोड हंगाम मंजुरांसाठी पर्वणीच असतो. दरम्यान, ऊसतोडणीहून आल्यानंतर मजुरांच्या हाताला कामही राहत नाही. त्यामुळे दोन-चार महिने मजुरांना गाव परिसरात रोजगार शोधावा लागतो.

# श्री.नारायण महाराज यांच्या संकल्पनेतून अण्णाभाऊ साठे पुतळा परिसराची स्वच्छता

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : महाराष्ट्राच्या पुण्यभूमीला संतांची थोर परंपरा लाभली आहे.प्रत्येक संताचे कार्य वेगळे, अफाट आणि महत्त्वाचे आहे.ग्रामीण भागात स्वच्छतेची शिकवण देऊन समाज सुधारणा करणारे थोर संत गाडगे महाराज यांनी विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरून गाडगेबाबांनी



लोकांची मने स्वच्छ केली. किनवट तालुक्यातील बोधडी (बु) येथे ह.भ.प.नारायण महाराज माधापुरकर यांच्या संकल्पनेतून त्यांच्या उपस्थितीत सोमवार दि.२४-मार्च रोजी सकाळी बोधडी (बु) गावातील समस्त सत्संग परिवारातील पुरुष, महिला व तरुणांनी श्रमदानातून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक व संपूर्ण परिसर स्वच्छ केला. सत्संग परिवाराच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बीड जिल्हा परिषदेचा 15 कोटी 21 लाखाचा शिलकीचा अर्थसंकल्प

## सीईओ आदित्य जीवने यांनी केला अर्थसंकल्प जाहीर

बीड दि. 24 (प्रतिनिधी):- बीड जिह्ला परिषदेच्या 2025-26 या वर्षातील आरंभीची असेल ते सह एकूण महसुली जमा रुपये 16, 13,31, 102 इतकी असून प्रस्तावित खर्च 15 कोटी 21 लक्ष असून 91 लक्ष 43 हजार 102 इतका महसुली समितीच्या अर्थसंकल्पास आदित्य जीवने बीड जिह्ला परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सोमवारी सदर माहिती सभागृहात दिली. यावेळी प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते.

प्रारंभी मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुरेश केंद्रे यांनी जिह्ला



परिषदेच्या विभागनिहाय खर्चाच्या यावेळी बाबनिहाय तरतुद सादर केली. बांधकाम विभाग दोन कोटी 44 लक्ष 14 हजार, शिक्षण विभाग 1 कोटी 74 लक्ष 45000, आरोग्य विभाग 19 लक्ष 2000, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग 01 कोटी, समाज कल्याण विभाग 03 कोटी 51 लक्ष 10000, महिला व बालकल्याण विभाग 74 लक्ष 4000, कृषी विभाग 30 लक्ष 40 हजार, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग 74 लक्ष 3000, वनीकरण विभाग व व्याज 10,000, पंचायत राज कार्यक्रम विभाग 03 कोटी 93 लक्ष 56 हजार, लघु पाटबंधारे विभाग 10, 400, एकूण 15 कोटी 21 लक्ष 88,000 रुपयाच्या प्रस्ताविक खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

यावेळी अर्थसंकल्प मांडताना मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी, ग्रामविकासासाठी बीड जिह्ला परिषद कटिबद्ध असून विविध महत्वकांक्षी निर्णय घेण्यात आले आहेत ग्रामपंचायतीचे सक्षमीकरण महिलांचे सबलीकरण, शिक्षण आणि आरोग्य विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची तरतुदीसह माहिती तसादर केली. जिह्ला परिषद अंतर्गत विविध विभागाच्या उपक्रमासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण विकासाच्या विकासाला चालना देण्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी आणि विकासासाठीच्या योजना राबविण्याचा अर्थसंकल्पाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी महसुली जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीचे सविस्तर वाचन करून उपस्थित विभाग प्रमुख आणि पत्रकारांना सविस्तर माहिती दिली.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत डॉ. ज्ञानोबा मोकाटे, प्रकल्प संचालक राजेश मोराळे, जिह्ला आरोग्य अधिकारी डॉ. उह्लास गंडाळ, प्रभारी कार्यकारी अभियंता बांधकाम (1), पशुसंवर्धन अधिकारी विजय देशमुख, आदीसह विभाग प्रमुख उपस्थित होते.

# शिवरायांचा अपमान करणारा प्रशांत कोरटकरला तेलंगणातून अटक?

मोठी बातमी समोर येत आहे, सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार प्रशांत कोरटकरला अटक करण्यात आली आहे. त्याला तेलंगणामधून अटक केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या कोरटकरला अटक केल्याची माहिती समोर येत आहे. कोरटकर याने शिवरायांबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं होतं, त्यानंतर तो फरार झाला होता, अखेर त्याला अटक केल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान कोरटकरच्या अटकेची बातमी समोर आल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. ‘यामध्ये सरकारचं काही कार्यकर्तृत्व नाहीये, कारण जेवढं शक्य आहे, तेवढं महिनाभर महाराष्ट्र सरकारनं प्रशांत कोरटकरला प्रिव्हिलेज देण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या माहितीप्रमाणे आज प्रशांत कोरटकरचा अटकपूर्व जामीन होता, कदाचित



तो जामीन फेटाळला गेला असेल किंवा तो जामीन मिळणारच नाही याची त्याला खात्री झाली असेल. त्यामुळे तो सलेंडर झाला आहे, सलेंडर होताना तो महाराष्ट्रात नाही तर तेलंगणामध्ये झाला आहे. आतापर्यंत महाराष्ट्रातले सर्व आरोपी तेलंगणा, गुजरात अशा राज्यांमधून आणले आहेत. म्हणजेच महाराष्ट्र पोलीस कुचकामी ठरत आहेत. सरकार पाठीशी असेल तर ते सर्व शक्य आहे. एक महिनाच काय आरोपीला पकडण्यासाठी सहा-सहा महिने लागू शकतात. कृष्णा आंधळे किती दिवस झाले फरार आहे. त्यामुळे सरकार पाहिजे तितके दिवस एखाद्याला बाहेर ठेऊ शकतं. प्रशांत कोरटकरला अटक करण्यामागे कालचा कुणाल कामराचा प्रकार आणि सगळंच अंगशी आलं म्हटल्यावर कुठून तरी त्यावर पडदा टाकला पाहिजे म्हणून त्याला अटक करण्यात आली असावी,’ असं सुषमा अंधारे यांनी म्हटलं आहे. दरम्यान प्रशांत कोरटकर याने शिवरायांबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. त्याचे कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाल्यानंतर तो कॉल माझा नव्हता असा दावा देखील त्याने केला होता. त्यानंतर तो अचानक गायब झाला होता. अखेर त्याला अटक करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २५ मार्च २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### रंगणार आयपीएलचा महाथरार!

चॅम्पियन ट्रॉफी २०२५ भारतीय क्रिकेट संघाने जिंकल्यापासून भारतीय क्रिकेटप्रेमींमध्ये एक वेगळाच उत्साह संचारला आहे. देशांतर्गत क्रिकेट सामने, लीग सामने, अन्य देशांसोबतचे सामने या स्पर्धा नेहमीच आयोजित केल्या जातात. पण अन्य स्पर्धा आणि आयपीएल यामध्ये जमीन आस्मानाचा फरक आहे. आयपीएलचा महाथरार म्हणजे षटकार-चौकारांची स्फोटक खेळी. कधी कोणाला सूर गवसेल आणि कोण सामना एकहाती फिरवून जाईल, याची शाश्वती आयपीएलमध्ये कोणालाही देता येत नाही. आयपीएल २०२५ बाबत उत्साह आता शिगेला पोहोचला आहे. क्रिकेटचे चाहते एक एक दिवस मोजत आहेत. आता आयपीएलला केवळ काही तासच शिल्लक राहिले आहेत. जगातील सर्वात प्रसिद्ध आणि मोठ्या टी-२० लीगपैकी एक असणाऱ्या इंडियन प्रीमियर लीगच्या १८ व्या सीजनला शनिवार, दि. २२ मार्चपासून सुरुवात होत आहे. कोलकाता येथील ईडन गार्डन्स या मैदानावर २२ मार्च रोजी शुभारंभाचा सामना खेळवला जाईल आणि २५ मे रोजी याच मैदानावर आयपीएल स्पर्धेतील अंतिम सामना खेळवण्यात येईल. आयपीएलमध्ये सहभागी होणाऱ्या संघामध्ये केवळ देशातीलच नाही तर परदेशातील खेळाडूंचाही सहभाग असल्याने या स्पर्धेतील प्रत्येक सामना क्रीडाप्रेमींना मेजवानी देणारा असतो. आयपीएल स्पर्धेमुळे केवळ नावाजलेल्या खेळाडूंनाच नाही तर ग्रामीण भागातील खेळाडूंनाही एक चांगले व्यासपीठ उपलब्ध आहे. आयपीएलच्या माध्यमातून अनेक खेळाडू मागील काही वर्षांत प्रकाशझोतामध्ये आले आहेत. त्यांच्या अर्थकारणालाही गती मिळाली आहे. मॅच फिक्सिंगच्या प्रकरणामुळे क्रिकेटकडून दुसरीकडे वळलेला वर्ग आयपीएलच्या सामन्यांमुळे पुन्हा क्रिकेटकडे वळू लागला आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. या हंगामात रॉयल चॅलेजर्स बंगळूरु एका नवीन कर्णधारासह आयपीएल २०२५ मध्ये प्रवेश करत आहे. फ्रँचायझीने रजत पाटीदारकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली आहे. दुसरीकडे, कोलकाता नाईट रायडर्स हा गतविजेता आहे. यानंतरही संघाने आपला कर्णधार कायम ठेवला नाही. भारतीय संघाबाहेर असलेला अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणे संघाची धुरा सांभाळेल. यावर्षी अनेक संघाना आपला नवीन कर्णधार मिळाला हे पाहायला मिळाले. आयपीएल स्पर्धेला २२ मार्चला शुभारंभ होणार असला तरी या स्पर्धेच्या आयोजनासाठी नोव्हेबर २०२४ पासून सुरुवात झाली आहे. २४ आणि २५ नोव्हेबर रोजी आयपीएल २०२५ साठी मेगा लिलाव पार पडला होता. यात जवळपास १८२ खेळाडूंना फ्रेंचायझींनी संघात घेतले. या खेळाडूंनी गेल्या काही महिन्यांपासून आयपीएल २०२५ साठी सरावाला सुरुवात केली आहे. इंडियन प्रीमियर लीग २०२५ या जगप्रसिद्ध टी-२० लीगसाठी २४ आणि २५ नोव्हेबर रोजी सौदी अरेबिया येथे मेगा ऑक्शन पार पडले. मेगा ऑक्शनमध्ये तब्बल ५७७ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यापैकी केवळ १८२ खेळाडू संघांनी विकत घेतले. या खेळाडूंना विकत घेण्यासाठी जवळपास ६३९.१५ कोटी रुपये फ्रेंचायझींनी खर्च केले. यंदाही स्पर्धेत १० संघांचा सहभाग असणार आहे. या स्पर्धेमुळे केवळ खेळाडूंनाच नाही तर संघमालकांनाही खऱ्या अर्थाने ग्लॅमरस प्राप्त झाले आहे. सुरुवातीच्या काळात मुंबई इंडियन्सच्या संघमालक निता अंबानी यांच्याकडेच फोकस असायचा. अर्थात त्याला कारणही तसेच होते. त्या एक तर देशातील आघाडीचे उद्योजक मुकेश अंबानी यांच्या त्या पत्नी आहेत. याशिवाय त्या सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. मुंबई इंडियन्सच्या प्रत्येक सामन्याला त्यांची उपस्थिती व खेळाडूंशी असलेली मैत्री, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यातील त्यांचा सहभाग यामुळे आयपीएल स्पर्धा म्हटल्यावर नीता अंबानी या नेहमीच चर्चेत राहिल्या आहेत; परंतु मागील आयपीएल स्पर्धेपासून नीता अंबानी या काहीशा पिछाडीवर पडल्या असून इंडियन प्रीमियर लीगमधील सनरायझर्स हैदराबादच्या संघ मालक असलेल्या काव्या मारन यांचीच जोरदार चर्चा होत असते. काव्या मारन या स्वतः उद्योजिका असून त्या स्वतः प्रत्येक सामन्याला हजर राहून खेळाडूंना प्रोत्साहित करत असतात. त्यांच्या सौंदर्याचीही चर्चा होत असून सनरायझर्स हैदराबादचा सामना सुरू असताना कॅमेऱ्याचा अधिक फोकस खेळाडूंपेक्षा काव्या मारन यांच्यावरच अधिक असतो, असे म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही. प्रभावी राजकीय आणि उद्योगपती कुटुंबातील सदस्य असूनही काव्या तिच्या खासगी लाईफबद्दल खूप प्रायव्हसी जपते. ती ३२ वर्षांची असून संपूर्ण जग फिरली आहे. मात्र तरीही ती सोशल मीडियावर फारशी सक्रिय नाही. आयपीएलमधील सनरायजर्स हैदराबाद शिवाय ती ङ्कसाउथ आफ्रिका २० टू र्नामेटफ क्रिकेट लीगमधील ङ्कसनराइजर्स ईस्टर्न केपफ संघाची मालक आहे. काव्या तिच्या आई-वडिलांची एकुलती एक मुलगी आहे. इन्स्टाग्राम किंवा ट्विटरवर तिचे व्हेरिफाईड अकाऊंट नाही. पण सनरायजर्स हैदराबाद संघाच्या फिशियल ट्वि टर अकाऊंटवर तिचे संघाशी संवाद साधतानाचे व्हीडिओ आहेत. या आयपीएल स्पर्धेत विविध देशांतील नावाजलेले व स्फोटक खेळासाठी प्रसिद्ध असलेले खेळाडू सहभागी होत असल्याने गोलंदाजांना या स्पर्धेत फारशी चमक दाखविता येत नाही. जेमतेम २० षटकांचा खेळ व त्यातील १२० चेंडूंमध्ये प्रत्येक चेंडू सीमारेषेबाहेर जावा, ही क्रिकेटप्रेमींची अपेक्षा असते. स्पर्धेत जितकी जास्त चमक दाखवू, तितकी अधिक किंमत आपल्याला आगामी स्पर्धेसाठी मोजली जाईल, हे अर्थकारणाचे गणित डोक्यात ठेऊनच प्रत्येक खेळाडू या स्पर्धेमध्ये आपली सर्वोत्तम कामगिरी दाखविण्याचा प्रयत्न करत असतो. शनिवारपासून सुरू होणाऱ्या आयपीएल स्पर्धेमुळे पुढील दोन महिने क्रिकेटप्रेमींना दर्जेदार सामन्यांचा आस्वाद घ्यावयास मिळणार आहे.

# जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी सोप्पा उपाय, सेंद्रिय शेती महागच? कागदावर करा गणित?

उन्हाळा सुरु झाला आहे आणि रब्बी पिकांची काढणीहि झाली आहे. ज्या भागात पाण्याची कमतरता आहे अशा भागात उन्हाळी पिक न घेतल्यामुळे शेत मोकळी पडली असतील. बऱ्यापैकी शेतकरी वर्ग या जमिनी नांगरून १-२ महिने उन्हात तापत ठेवतात. आणि त्यानंतर वर्षभर चांगल उत्पादन घेण्यासाठी शेणखत टाकून जमिनी पेरणीसाठी तयार करतात. साधारणपणे एकरी किमान ५-६ टन तरी शेणखत टाकण्याचा सल्ला तज्ञ मंडळी देत असतात. उन्हाळ्यात सगळ्यांनाच शेणखत टाकायचं असतंय त्यामुळे ते बऱ्यापैकी महागही मिळत आणि बऱ्याच वेळा तर मिळतही नाही कारण आपल्याकडे जनावरांची संख्या कमी होत चालली आहे. मग यावर चांगला उपाय म्हणजे हिरवळीच्या खताचा वापर करणे... हिरवळीचं खत म्हणजे वेगळ काही नसून ताग आणि धैंचाच आहे. एकरी २० ते २२ किलो धैंचा तर तागाच बियाणे आकाराने मोठ असल्याने २५ किलो एकरी पेरणीसाठी लागतो. सपाट वाफा पद्धतीने पेरणी करून फुले लागन्याच्या अवस्थेत म्हणजे साधारणपणे ४५ दिवसांनी ताग धैंचा जमिनीत गाडून टाकावा. फुले लागण्याच्या धैंच्याच्या मुळाशी नत्र स्थिरीकरण करणाऱ्या गाठींची संख्या अधिक असते, झाड लुसलुशीत असते त्यामुळे कुजण्याची प्रक्रिया देखील जलद होते. हिरवळीचे खत गाडायला उशीर केल्याने नत्र स्थिरीकरण करणाऱ्या गाठींची संख्या कमी होते, झाडांची खोड कडक होतात त्यामुळे कुजण्यास वेळ लागतो. ताग धैंचा करत असताना बियाणे उपब्धतेची मोठी अडचण असते कारण बऱ्याच वेळा बियाणे बाजारात मिळत नाही म्हणून शेतकरी ताग धैंचा फारसा पेरत नाहीत . त्यावरहि आपल्याला पर्याय म्हणून अगदी थोड्यापार गोष्टी वगळता घरच्या घरी कमी खर्चात बियाणे तयार करून या हिरवळीच्या खताची पेरणी करता येणार आहे. हिरवळीच्या खताचे बियाणे घराच्या घरी कसे तयार करावे ? ४ किलो बाजरी, १ किलो चवळी, १ किलो मुग, १ किलो उडीद, २५० ग्राम तीळ, ९ किलो धैंचा, आणि ३ किलो ताग एवढ बियाण एकत्र करून ते १ एकर क्षेत्रासाठी पेरायचे आहे. जर ताग आणि धैंचा उपलब्ध झाला नाहीच तर त्याऐवजी अशा चवळी, सोयाबीन, गवार हे आपण प्रत्येकी ४ किलो घेऊन पेरणी करू शकतो. साधारणपणे पेरणी केल्यानंतर एक पाणी आणि ८ दिवसांनी दुसरे पाणी आणि १५ दिवसांनी तिसरे पाणी देऊन फुले लागली कि जमिनीत गाडून टाकावे. ज्या शेतकऱ्यांकडे हे २ ते ३ वेळेस पाणी देण्याची सोय आहे त्यांनीच फक्त हे हिरवळीचे खत तयार करायचे आहे. उन्हाळ्यात ऊन अधिक असल्याने खरिफ-रब्बी हंगामाच्या मानाने तेवढी वाढ होत नाही. म्हणुन आपण पावसाळ्यात कोणतही दुसर पिक घेणार नसू तेव्हा हे खत पेरू शकतो किंवा खरिफ पिकांची काढणी झाल्यानंतर आणि रब्बी पेरणी अगोदर देखील घेता येते. कापूस, तूर, ऊस यासारख्या पिकांची लागवड केली तर दोन ओळींमध्ये बऱ्यापैकी मोकळी जागा असते. या जागेमध्ये देखील हिरवळीचे खत अंतर पिक म्हणुन घेता येते. पावसाळ्यात जर हिरवळीच खत घेणार असू तर पहिला पाउस पडला कि लगेच पेरणी होणे गरजेचे असते. पेरणी नंतर पाऊस गरजेचा असतो. तसेच पिक गाडायाच्या वेळेस वाफसा परिस्थिती असणे अत्यंत महत्वाचे असते आणि गाडून झाल्या नंतर पुन्हा पाउस गरजेचा असतो. त्यामुळे पावसाळ्यात हिरवळीचे खत घेणार असू तर पावसाचा अंदाज घेऊनच आपल्याला पेरणी आणि गाडणी करायची आहे. आता या हिरवळीच्या खताचे नेमके फायदे काय आहेत जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. जमिनीची धूप कमी होते. शेतातील तन नियंत्रण चांगल्या पद्धतीने होते. हिरवळीच्या खतांबरोबर तणांच्या बियादेखील कुजल्या जातात त्यामुळे तन व्यवस्थापन चांगल्याप्रकारे करता येत. अल्कलाईन शेतजमिनीच रिक्लमेशन करण्याचं म्हणजेच जमिनीचा सामू नियंत्रित करण्याचं काम हिरवळीच्या खताद्वारे केल जात. रूट नॉट निम्याटोडच म्हणजेच मुळांवर वाढणाऱ्या सुत्रकृमीच देखील नियंत्रण करण्याचं काम हिरवळीचे खत करते. जमीन भुसभुशीत होते, जमिनीतील सूक्ष्म अन्न घटकांचं प्रमाण वाढत. शेणखतापेक्षा यात वेगळ काय आहे किंवा जास्त काय आहे हे पाहू . हिरवळीच्या खतामधून शेणखतापेक्षा सहापटीने नत्र, पाच पटीने फोस्फोरस आणि चारपटीने पालाश जास्त मिळते. एक सरसगट पाहायला गेल तर किमान पाचपट अधिक पोषक मुल्ये या हिरवळीच्या खतामधून मिळत असतात. शेणखतासाठी आणि हिरवळीच्या शेणखतासाठी एकरी खर्च किती येतो हे पाहू. किमान पाच सहा टन शेणखत एकरी टाकाव लागत याची म्हणजे दोन डम्पिंग ट्रोली तरी शेणखत टाकाव लागेल. एका डम्पिंग ट्रोलीत साधारण ३-३.५ टन शेणखत बसते आणि सध्या चांगल्या कुजलेल्या आणि उत्तम गुणवत्तेच्या एका ट्रोलीची किंमत पाच हजार रुपये आहे. म्हणजे एकरी लागतील किमान १० हजार. आता ते शेतात वाहून नेणे, ते संपूर्णपणे शेतात पसरवणे यासाठी वाहतुक आणि मजुरीचा खर्च ३ हजार जरी पकडला तरी एकून खर्च झाला १३ हजारांचा. हिरवळीच्या खताला किती खर्च येईल, तर बियाणे लागेल साधारणपणे हजाराच, मशागतीचे हजार, पेरणीसाठी हजार, आता इथ पेरणी न करता आपण हाताने फेकून देखील पेरणी करू शकतो, इथ पेरणीला लागणारे हजार रुपए वाचूही शकतात. उन्हाळ्याचे दिवस असल्याने किमान तीन वेळेस तरी पाणी द्याव लागेल, पाणी देण्याची मजुरी हजार पकडली, आणि नंतर जमिनीत गाडायाचा खर्च २ हजार रुपये. एकून खर्च झाला ५-६ हजार रुपये. म्हणजे खर्च ५० टक्क्यांपेक्षा आला आणि जमिनीची पोषकता तर ५ पटीने अधिक वाढली. यासोबतच याआधी पाहिल्याप्रमाणे फायदेही आहेतच. त्यामुळे मंडळी यावर्षी नक्कीच सेंद्रिय शेतीमध्ये हिरवळीच्या खतांचा वापर करून शेतजमीनीची सुपीकता वाढवा आणि रसायनमुक्त पिकवा. **पल्लवी चिंचवडे..सेंद्रिय शेती अभ्यासक**

# समोरच बसले, एकटक पाहिलं... सत्ताबदलानंतर पहिल्यांदाच आदित्य ठाकरे आणि एकनाथ शिंदे समोरासमोर, बैठकीत नेमकं काय घडलं?



मुंबईत रस्ते कामाच्या संदर्भात एक बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह आदित्य ठाकरे उपस्थित आहे. या बैठकीच्या निमित्ताने पहिल्यांदाच आदित्य ठाकरे आणि एकनाथ शिंदे हे आमनेसामने आले आहेत. या बैठकीदरम्यानचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.या व्हिडीओत एकनाथ शिंदे आणि आदित्य ठाकरे हे आमनेसामने आल्याचे दिसत आहे. एकनाथ शिंदे हे मुंबईतील रस्ते कामाच्या बैठकीसाठी येताच सर्व आमदारांनी त्यांचे उभं राहून स्वागत केले. मात्र आदित्य हे खुर्चीवरच बसून राहिले. यानंतर आदित्य ठाकरे हे त्यांच्या समोरच्या खुर्चीवर बसून एकनाथ शिंदेंना एकटक पाहत होते. तर दुसरीकडे एकनाथ शिंदेंनीही त्यांच्याकडे पाहिले नाही. ही सर्व घटना कॅमेऱ्यात कैद झाली. बैठकीत काय घडलं? मुंबईतील रस्त्यांच्या क्रॉक्रीटीकरणाच्या कामांबाबत आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी व्हावी, अशी मागणी आदित्य ठाकरेंनी केली होती. एकनाथ शिंदे यांच्यासह विधानसभा अध्यक्षांकडे ही मागणी करण्यात आली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे रस्ते कामांबाबत चौकशीची मागणी करणार असल्याची माहिती आदित्य ठाकरेंनी दिली. एकनाथ शिंदे यांनी रस्ते कामांच्या आढावा घेणारा रिपोर्ट सादर केला. यात त्यांनी टप्पा १ मध्ये २३ टक्के काम झाले. तर टप्पा २ मध्ये ०.५ टक्के काम झाल्याची माहिती दिली. रस्त्यांच्या कामांचा दर्जा; मुदतीत काम पूर्ण होणार का? समन्वयातील अडथळे यावर आमदारांनी लक्ष वेधले. आशिष शेलार यांनीही आपल्या मतदारसंघातील रस्ते कामाबाबत असणाऱ्या समस्या मांडल्या.

येत्या ३१ मे पर्यंत मुंबईतील सुरु असलेली सर्व कामे पूर्ण करण्याचे आदेश यापूर्वीच मुंबई महापालिका आयुक्तांनी दिले आहेत. १५ मीटरपेक्षा कमी असणारे, लहान रस्ते सिमेंट क्रॉंक्रीटीकरण न करता अस्फॉल्ट मध्ये त्यांची कामे करावीत, अशी सूचनाही आमदारांनी केली.

# आरक्षणाच्या याचिकेसाठी आर्थिक मदत करा-शिवाजी कवठेकर

कॉंग्रेसच्या शरद पवार सरकारने २३ मार्च १९९४ रोजी जीआर काढून मंडल आयोगाच्या नावाखाली ओबीसींना बेकायदेशीर पद्धतीने १६ टक्के आरक्षण वाढवून दिले. हे १६ टक्के आरक्षण घटनाबाह्य असल्यामुळे ते रद्द करण्यात यावे!, अशी मागणी करणारी जनहित याचिका शिवाजी कवठेकर, विनोद इंगोले, नारायणराव थोरात, गोविंद सवासे व शेख युसूफ या पाच जणांच्यामार्फत आरक्षण बचाव

आंदोलन समितीच्यावतीने लोकवर्गणीतून मुंबई उच्च न्यायालयात जुलै २०२२ मध्ये दाखल करण्यात आली होती.सदरील याचिकेच्या सुनावणीकरता आरक्षण बचाव आंदोलन समितीने पाच लाख रुपये सुरक्षा अनामत रक्कम म्हणून न्यायालयात जमा केलेले आहेत.सदरील याचिका सध्या सुनावणीसाठी मा उच्च न्यायालयासमोर आहे. तथापि, या याचिकेसाठी पैशांची गरज आहे म्हणून लोकांनी आर्थिक मदत करावी, असे आवाहन सर्व याचिकाकर्त्यांच्या वतीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकातून करण्यात आलेले आहे. पत्रकात म्हटले आहे की, सदरील याचीकेसाठी आर्थिक मदत करावी असे आवाहन आरक्षण बचाव आंदोलन समितीच्या वतीने जानेवारी २०२२ मध्ये केले होते. त्यावेळी लोकांनी केलेली मदत जवळपास चार लाख रुपये होती.या चार लाख रुपयांच्याआधारेच आरक्षण बचाव आंदोलन समितीने जुलै २०२२ मध्ये याचिका दाखल केली. पण त्यावर्षीच

झालेल्या नोव्हेंबरच्या सुनावणीमध्ये न्यायालयाने प्रत्येक याचिकाकर्त्यासाठी एक लाख रुपये असे एकूण पाच लाख रुपये डिपॉझिट म्हणून जमा करा नसता याचिका सुनावणीला घेणार नाही असे सांगितले. त्यावेळी पैसे परत करण्याच्या हमीवर काही लोकांनी तीन लाख रुपयांची मदत केली; तर दोन लाख रुपये खाजगी व्यक्तीकडून कर्जाने घेऊन आम्ही ते पाच लाख रुपये शिवाजी कवठेकर यांच्या नावाने तीन लाख, तर विनोद इंगोले यांच्या नावाने दोन लाख रुपये डिसेंबर २०२२ मध्ये न्यायालयात जमा केले.त्यानंतर याचिकेच्या १२ जानेवारी २०२३, १६ मार्च, २७ एप्रिल, २६ जून,२७ ऑगस्ट, सप्टेंबर, ८ नोव्हेंबर अशा सात तारखा झाल्यानंतर डिसेंबर २०२३ मध्ये याचिका सुनावणीला घेऊन,मा न्यायालयाने सरकारला याचिकेत करण्यात आलेल्या २३ मार्च १९९४ च्या जीआर रद्द करण्याच्या मागणीवर उत्तर देण्यास फर्मावले. त्यावर डिसेंबर २०२३ मध्ये सरकारचे महाधिवक्ता वीरेंद्रकुमार श्रॉफ यांनी स्वतः न्यायालयात उपस्थित राहून सरकारचे उत्तर दाखल केले.सरकारने दिलेल्या त्या उत्तरावर आपले प्रत्युत्तरही (रिजॉइंडर) आपण लेखी स्वरूपात जानेवारी २०२४ मध्ये लेखी स्वरुपात दाखल केले.परंतु मार्च २४ मध्ये राज्य सरकारने मराठा समाजाला ५० टक्क्यांच्या वर दिलेल्या दहा टक्के आरक्षणावर आक्षेप घेणारी याचिका त्रिसदस्यीय विशेष घटनापीठ स्थापून न्यायालयाने नियमितपणे सुनावणीला घेतल्यामुळे, आपल्या याचिकेवर गेल्या संपूर्ण वर्षभरात सुनावणी काही होऊ शकली नाही.त्यानंतर या चालू वर्षात १५ जानेवारी व १७ फेब्रुवारी अशा दोन तारखा पडल्या होत्या.परंतु मा मुख्य न्यायाधीश यांची त्यादरम्यानच बदली झाल्यामुळे या दोन्हीही तारखा होऊ शकल्या नाहीत.

# जागतिक क्षयरोग दिन आणि टीबी मुक्त ग्रामपंचायत गौरव सोहळा

## उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : जागतिक क्षयरोग दिनानिमित्त 24-मार्च रोजी वर्षभरात, निकषाच्या आधारावर टीबी मुक्त ग्रामपंचायत करण्यासाठी परिश्रम घेतलेल्या 16 तालुक्यातील 248 पैकी 67 ग्रामपंचायती रौप्य पदक स्मृतीचिन्हास पात्र ठरल्या आहेत. या ग्रामपंचायतचे सरपंच, ग्रामसेवक, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते महात्मा गांधी स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र पुष्पगुच्छ देवून गौरव करण्यात आला. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पंचायत ) मंजुषा कापसे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हिरानी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे, अर्धापूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बदीउद्दीन, जागतिक आरोग्य संघटनेच्या सल्लागार



अधीक्षक डॉ. विद्या झिने , जिल्हा डॉ. सम्यक खैरे यांची उपस्थिती होती. या ग्रामपंचायती मागील वर्षीही ब्रॉंझ स्मृती चिन्हाने गौरविल्या गेल्या होत्या. मागच्या वर्षातील 86 ग्रामपंचायतीपैकी 67 ग्रामपंचायती पुन्हा टीबी मुक्त ठरल्याने या ग्रामपंचायतींना सिल्वर स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात आले. जनसामान्यांमध्ये क्षयरोगाविषयी जनजागृती करून , क्षयरुग्ण शोधून यांना नियमित औषधोपचार देत लवकरात लवकर क्षयमुक्त करावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी केले. यानंतर अप्पर जिल्हाधिकारी राम बोरगावकर यांनी क्षयरुग्णांनी नियमित औषधोपचार घेऊन रोगमुक्त व्हावे असे आवाहन केले. यासोबतच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड आदींची समयोचित भाषणे झाली.

# आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या चार जणावर गुन्हा दाखल



माजलगाव। प्रतिनिधी २१ मार्च रोजीच्या रात्री ९वा.पोनि.राहुल सुर्यतळ यांना गोपनीय माहिती मिळाली की, साबळे, ओंकार घोडके,शुभम पाटील,विशाल सोळंके संगनमत करुन दोन समाजात द्वेष भावना वाढविण्याचा उद्देशाने त्यांच्या इंस्ट्राग्राम या सोशलमीडिया खात्या वरुन दोन समाजात तेढ निर्माण होईल. अशी आक्षेपार्ह पोस्ट टाकल्याचे आढळुन आल्याने नमुद नामे चार जणांवर पो.अमलदार कदम यांच्या फिर्यादी वरून माहिती व तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ सह ३५३(२)भान्यासं प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढिल तपास पोनि. सुर्यतळ करीत आहेत. अशी माहिती प्रसिद्ध पत्रकाद्वारे सुर्यतळ यांनी दिली असुन नागरिकांनी सोशलमीडियावर पोस्ट करताना सामाजिक भावना लक्षात घेऊन पोस्ट करावी ,सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करु नये असे आवाहन केले

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःशहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २५ मार्च २०२५
https://lokaarambh.com


# आमिर खानने संतोष देशमुखांच्या मुलाला घातली मायेची फुंकर

पुणे : गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं हत्या प्रकरण चांगलंच गाजत आहे. संतोष देशमुख यांचा अमानुष छळ करत निघृ ण हत्या केली. अलीकडेच याबाबतचे काही फोटोज सोशल मीडियावर व्हायरल झाले. यानंतर अजित पवार गटाचे मंत्री धनंजय मु डे यांना आपल्या मंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. सध्या राज्यभर संतोष देशमुख यांच्या न्यायाची लढाई



सुरू आहे. वाल्मीक कराडसह अन्य आरोपीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे. या सगळ्या घडामोडी सुरू असताना बॉलिवूड अभिनेता आमिर खानने संतोष देशमुख यांचा मुलगा विराज आणि भाऊ धनंजय देशमुख यांची भेट घेतली. यावेळी आमिरने संतोष देशमुख यांच्या मुलाला मायेनं जवळ घेतलं. घट्ट मिठ्ठी मारत मायेची फुंकर घातली. नुकतंच पुण्यातील बालेवाडी स्टेडियममध्ये पाणी फाऊंडेशनचा एक कार्यक्रम पार पडला.

## रजू महिलांना संत गोरोबाकाका संस्थेच्या वतीने शिलाई मशीन वाटप

शिरुर कासार-प्रतिनिधी समाजातील विधवा, घटस्फोटीत अशा गरजू महिलांसाठी तालुक्यातील ब्र.येळंब येथील संत गोरोबाकाका बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने (दि.८) शनिवार रोजी शहरातील कालिकादेवी विद्यालयात शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. जागतिक महिला दिनानिमित्त महिला बचत गट मेळावा घेत शहरातील कालिकादेवी विद्यालयात ब्र.येळंब येथील संत गोरोबा काका बहुउदेशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने विधवा, धट्स्फोटित अश्या महिलांना (दि.८) शनिवार रोजी शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.यावेळी तालुक्यातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या तसेच तहसीलदार सुरेश घोळवे यांनी पुढ े बोलताना सांगितलले कि महिलांनी आपल्या पायावर उभे राहत व्यवसायाकडे वळत छोटा मोठा व्यवसाय सुरु करावा यातून कुटूंबाच्या दैनंदित खर्चात हातभार लागत मदत होते. महिलांनी स्वावलंबी बनले पाहिजे ठिकठिकाणी महिला आपल्या कामातून वेगळा ठसा उमटत आहेत.ग्रामीण भागातील महिलांनी पुठे येत व्यवसाय सुरु करावा असे मार्गदर्शन केले.यावेळी प्राचार्य विश्वास कंधारे,पो.नी गणेश ढोकरट, गटविकास अधिकारी संजय केंद्र,संस्थेचे सचिव अंबादास गोरे तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## भाटवडगाव,नविन वसाहत सार्वजनिक रस्ताच अज्ञाताने अडवला,

माजलगाव। प्रतिनिधी शहरापासून जवळच असलेल्या भाटवडगाव हद्दीतील नविन वसाहत येथील गट नंबर १३८ येथील शिक्षक वसाहतीत अज्ञात व्यक्तीने मुख्य रस्त्यावरच पत्र्याचे शेड उभे केले असून येथील रहिवासी व विद्यार्थ्यांची गैरसोय केली आहे तो मुख्य रस्ता रहदारीस पर्वत चालू करून देण्याची मागणी भाटवडगावचे सरपंच, ग्रामसेवक यांच्या कड े लेखी निवेदनाद्वारे रहिवासी यांनी करुन त्याच्या प्रती संबंधित वरिष्ठ अधिकारी यांना दिल्या आहेत या विषय दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की माजलगाव शहरा पासून जवळच असलेल्या भाटवडगाव, नविन वसाहतीतील गट नंबर,१३८ मधील चंद्रशेखर साखरे व उत्तम राठोड यांच्या मधून जाणार जो सार्वजनिक रस्ता आहे तो रस्ता मुळ मालक चोरमले यांनी सोडलेला आहे व तो पर्ववत आहे असे सागंतात परंतु या रस्त्यावर अज्ञात व्यक्तीने पत्र्याचे शेड उभारून सार्वजनिक रस्ताच अडवला आहे या रस्त्यावर रोजच शेकडो विद्यार्थी, विद्यार्थींनी शाळेत जातात हा रस्ता जवळपास दिड ते दोन कि.मी.लाबीचा आहे या रस्त्यावर कोठेच कोणाचा प्लोट नाही मग हाच प्लोट कसा असा प्रश्न उपस्थित केला जात आहे हा सार्वजनिक रस्ता अडविल्या मुळे येथील रहिवासी व विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे तो रस्ता पुर्ववत रहदारीस चालू करून द्यावा नसता ते पत्र्याचे शेड रहिवासी काढून टाकतील होणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार राहिल असा इशारा सरपंच, ग्रामसेवक यांना लेखी निवेदन द्वारे देवुन त्याची प्रती मा.उप विभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस निरीक्षक, गटविकास अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत

## डिजिटल मिडिया परिषदेच्या सदस्य नोंदणीस प्रारंभ -जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे

गेवराई । प्रतिनिधी मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडिया परिषदे-चे सदस्य नोंदणी अभियान राज्यभरात राबविले जात आहे. आपल्या जिल्ह्या-तही या सदस्य नोंदणी अभियानास प्रारंभ केला जात असून बीड जिल्ह्या-तील सर्व यु ट्यूब चॅनल व पोर्टल-चे संपादक आणि पत्रकार यांनी यात सहभाग घेऊन आपली सदस्य नोंदणी करावी असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे. महाराष्ट्र राज्यातील बीड, सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हा-पूर,परभणी, बुलढाणा, रत्नागिरी, पुणे, सिंधुदुर्ग, गडचिरोली, लातूर,नांदेड,राय-गड, आहिल्यानगर, छत्रपती संभाजीन-गरसह इतर जिल्ह्यात मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार तसेच विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्य अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांच्या मार्गदर्शनाखाली व डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या सुचनेनुसार त्याच बरोबर राज्य कार्याध्यक्ष संतोष शिंदे, राज्य उपाध्यक्ष अनिल उंबरकर, प्रदेश सदस्य अनिल धुपदळे,तानाजी जाधव, जितेंद्र सिरसाठ, अफताब शेख यांच्या सहकार्याने हे सदस्य नोंदणी अभियान युद्धपातळीवर राबविले जात आहे. त्या अनुषंगाने बीड जिल्ह्या-तही सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात केली जाणार आहे.



बीड । प्रतिनिधी बीडचे सन्मानपत्र लेखक तथा निवेदक सुरेश साळुंकेंचा छत्रपती संभाजीनगरच्या उपजिल्हाधिकारी मा.सौ अंजलीताई धानोरकरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र लेखन आणि स्वातंत्र्य सेनानी रामरावजी आवरगावकर विधी महाविद्यालयाच्यावतीने उत्कृष्ट निवेदक पुरस्कार मिळा

# नाभिक सखी सन्मान सोहळा उत्साहात

बीड - महाराष्ट्र नाभिक महामंडळ बीड जिल्हाच्या वतीने नाभिक समाजातील महिलांचे सन्मान सोहळ्याचे आयोजन जन शिक्षण संस्थान या ठिकाणी करण्यात आले होते. यात नाभिक समाजातील विविध क्षेत्रातील यशस्वी महिलांचा सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला नाभिक समाजातील पुरुष व महिलांची लक्षनीय उपस्थिती लाभली.यात आदर्श शिक्षक,आदर्श माता,आदर्श राजकीय क्षेत्र,आदर्श सामाजिक क्षेत्र अशा विविध क्षेत्रातील महिलांचा सत्कार नाभिक सखी सन्मान पत्र देऊन संभाजीनगरच्या उपजिल्हाधिकारी सौ.अंजली धानोरकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी या





कार्यक्रमाच्या मुख्य मार्गदर्शनामध्ये सौ.अंजली धानोरकर यांनी स्वयंरोजगार करण्याचा निश्चय केला पाहिजे व यासाठी जिद्द चिकाटी कौशल्य व संघर्षशील जीवन जगून एक फार मोठी गरुड झेप घेऊ शकतो असे अनेक उदाहरण या आपल्या मार्गदर्शनात केले गेले यामुळे या ठिकाणी असणाऱ्या पारंपरिक व्यवसायाविषयी आणि महिला लघुउद्योजक मध्ये भरारी घेण्याची नक्कीच प्रेरणा या मार्गदर्शन मुळे मिळाली. तसेच हा सन्मान सोहळा सर्व समाजाला एक चांगला संदेश देणारा आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाचे ग्रामोद्योग अधिकारी श्री. डी. व्ही.फताटे, जनशिक्षण संस्थान चे संचालक देशमुख सर,महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक शिवशंकर साहेब, जिल्हा उद्योग मंडळ चे महाव्यवस्थापक किरण जाधव,दै. दिव्य लोकप्रभाचे उपासंपादक नितीन क्षीरसागर,आदर्श शिक्षक प्रताप काळे सर, सुरेश साळु ंखे निवेदक,जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे,शाम राऊत,अक्षय जाधव,आकाश सपकाळ,शिवाजी सरड े, तुकाराम राऊत,सुमित दोडके, संदीप टाकळकर,अशोक वैद्य,सुरेश झेंडे,अक्षय वाघमारे,गणेश काशीद, अमोल राऊत, संदीपान वाघमारे,आदी जण उपस्थित होते.

## नेकनूर येथील स्त्री व कुटीर रुग्णालयात जेवणात गंभीर त्रुटी उघड!

येळंब घाट - बीड तालुक्यातील नेकनूर रुग्णालयातील आहारासंदर्भात तक्र ारी प्राप्त झाल्यानंतर नेकनूर येथील स्त्री व कुटीर रुग्णालयात ग्र ामपंचायत सदस्य व पत्रकारांचा वतीने अचानक पाहणी दा ेरा करण्यात आला या पाहणी दरम्यान रुग्णांना मोफत दिल्या जाणाऱ्या जेवण्यात गंभीर त्रुटी असल्याचे उघड झाले रुग्णालयाच्या नोंद रजिस्टर मध्ये अंडी,के ळी,मटकी, यासारख्या पौष्टिक आहाराच्या उल्लेख नसून तो रुग्णांना दिला जात नसल्याचे दिसून आला मात्र प्रत्यक्षात रुग्णाची संवाद साधल्यानंतर समोर आले की त्यांना फक्त चपाती वरण व भात एवढेच जेवण दिले जात आहे



त्यामुळे आहार व्यवस्थापक मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे यावेळी पाहणी करताना नेकनूर चे सरपंच सु ंदर लांडगे, उपसरपंच सचिन शिंदे, पत्रकार व ग्रामपंचायत सदस्य अशोक शिंदे, पत्रकार सुरेश रोकडे तसेच इतर ग्रामपंचायत सदस्य पत्रकार सहभागी होते ग्रामपंचायत प्रतिनिधी कडून यासंदर्भात तात्काळ चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई करण्याची मागणी वैद्यकीय अधिकारी डॉ अशोक हुबेकर यांच्याकडे करण्यात आली.

## शिकलेल्या प्रत्येक युवकांच्या हाताला काम मिळाले म्हणजे विकसित भारत होय : सरवदे



आष्टी - शिक्षण घेतलेल्या प्रत्येक युवकांच्या हाताला काम मिळाले म्हणजे विकसित भारत होय असे प्रतिपादन प्र. कुलगुरू डॉ. वाल्मिक सरवदे यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व आनंदराव धोंडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बहुविद्याशाखिय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगीविद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू वाल्मिक सरवदे बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे हे होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे माजी मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर, डी. वाय पाटील महाविद्यालयाचे रजिस्टर अशोक पाटील, विद्यापीठाचे सिनेट सदस्य व प्राचार्य डॉ. हरिदास विधाते उपस्थित होते.

# तुलसी शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे सर ग्लोबल कन्व्हेंशन पुरस्काराने सन्मानित

बीड - शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल लोकमत समूहा तर्फे दिल्या जाणाऱ्या ग्लोबल कन्व्हेंशन पुरस्कार २०२५ तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक प्रदीप रोडे सर यांना प्राप्त झाला. या पार्श्वभूमीवर योग तज्ञ व आंतरराष्ट्रीय योग खेळाडू श्रीमती राधा तांबे यांच्याकडून शिक्षण तज्ञ प्रदीप रोडे सर व श्रीमती दीपा रोडे मॅडम यांचा सत्कार करण्यात आला.गेले कित्येक वर्षापासून शिक्षण



तज्ञ प्राध्यापक रोडे सर हजारो गरीब आणि सामाजिक व आर्थिक दृष्ट्या वंचित मुलांच्या उज्वल भविष्यासाठी अहो रात्र कष्ट करून एका तुलसी शैक्षणिक संस्थेचे रूपांतर वट वृक्षाप्रमाणे समूहामध्ये केले आहे. या अविरत कार्यासाठी अनेक बिकट प्रसंगाचा सामना करत प्राध्यापक रोडे सरांनी जिद्दीने आणि चिकाटीने समाजसेवेचे व्रत आपल्या शैक्षणिक कार्यातून पूर्ण केले आहे. आपल्या अपत्याप्रमाणे शैक्षणिक संस्थांचे ते संगोपन करत आहेत. आज तुळशी शैक्षणिक समूह मार्फत कित्येक जणांना रोजगार मिळत आहे, कित्येकांची उपजीविका भागत आहे, हजारो विद्यार्थ्यांच उज्वल भवितव्य या संस्थेच्या माध्यमातून घडत आहे. प्राध्यापक रोडे सरांच्या या भागीरथ प्रयत्नाला त्यांच्या अर्धांगिनी श्रीमती दीपा रोडे मॅडम यांची खंबीर साथ लाभली आहे त्याचाच परिणाम स्वरूप आज या रोडे परिवाराने समाजामध्ये शैक्षणिक संजीवनी देऊन भारतासाठी उज्ज्वल भविष्य देण्याचे काम केले आहे. त्यामुळे हे सुनिश्चित आहे की अशा निस्वार्थ सेवाभाव असणाऱ्या प्राध्यापक प्रदीप रोडे सारख्या व्यक्तिमत्त्वामुळे उद्याचा भारत २०४७ पर्यंत नक्की विकसित भारत असेल.

# गर्भाशयातून डॉक्टरांनी काढला तब्बल पावणे १७ किलोचा मासाचा गोळा, आता ती आई होऊ शकणार

एका महिलेच्या वारंवार ओटी पोटात दुखत होते. पोटाचा घेर देखील वाढत चालला होता. तिला वाटले ती गर त्यामुळे डॉक्टरांनी तिची तपासणी केली असता तिच्या पोटात तब्बल साडे सोळा किलोचा मासांचा गोळा निघाला आहे. या महिलेची शस्त्रक्रिया करण्यात आल्यानंतर हा मासांचा गोळा साडे सोळा किलोचा असल्याचा उलगडा झाला तेव्हा डॉक्टरांना देखील धक्का बसला आणि त्यानंतर डॉक्टरांनी या ट्युमरची गिनीज बुकात नोंद करण्यासाठी अर्ज केला आहे. अकोला येथील एका महिलेच्या पोटातून तब्बल साडे सोळा किलोचा ट्युमर काढण्यात डॉक्टरांना यश आले आहे. या ट्युमरचा आकार आणि वजनाचा रेकॉर्ड गिनिज बुकमध्ये नोंद करण्यात साली पाठवला आहे. 2 वर्षापासून मूलबाळ नसणारी परभणी येथील ही महिला अचानक पोटाचा आकार वाढत चालल्याने आणि पोट दुखीने त्रस्त होती. तिने अकोल्यातील डॉक्टरांना आशेने दाखवले तेव्हा तिच्या पोटात दुसरे तिसरे काही नसून चक्क मासांचा गोळा असल्याचे उघडकीस आले आहे. त्यानंतर या महिलेवर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. अकोला शहरातल्या लक्ष्मीनारायण मेमोरीयल हॉस्पिटलमध्ये महिलेवर शस्त्रक्रिया पार पडली. प्रसूती आणि स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. मुकेश राठी यांनी ही शस्त्रक्रिया केली आहे. साडे सोळा किलोचा मासाचा गोळा महिला रुग्ण गेल्या दोन वर्षांपासून पोट दुखण्याने त्रस्त होती. तिने या संदर्भात अनेक उपचार घेतले. मात्र दुखणे बरे होऊ शकले नाही. म्हणून



ती परभणीहून अकोल्यात उपचारा साठी आली होती. या महिलेच्या गर्भाशयात तब्बल साडे सोळा किलोचा मासाचा गोळा आढळला आहे. तब्बल 2 तास या महिलेवर शस्त्रक्रिया चालली. त्यानंतर या महिलेच्या पोटातून मांसाचा गोळा काढण्यात यश आल्याने या महिलेला नवजीवन मिळाले आहे. ट्युमरचा आकार आणि वजनाचा गिनिज रेकॉर्ड बुकमध्ये नोंदणी करण्यासाठी पाठवण्यात येणार असल्याचे प्रसूती आणि स्त्री रोग तज्ञ डॉ. मुकेश राठी यांनी सांगितले. ही गाठ नेमकी कशामुळे झाली हे समजू शकलेले नाही.

### त्यामुळे ती आई बनू शकणार आहे

डॉ. मुकेश राठी यांनी या रुग्ण महिलेच्या तपासण्या करून शस्त्रक्रियेची जटीलता जाणून घेतली आणि शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. शस्त्रक्रियेत महिलेच्या गर्भाशयातून 16.75 किलो वजनाचा गोळा काढण्यात आला. शस्त्रक्रियेदरम्यान गर्भाशयाला वाचवण्यात डॉक्टरांना यश आले आहे. त्यामुळे ती आई बनू शकणार आहे. आता या महिला रुग्णाची तब्येत चांगली असून चालणे, फिरणे, खाणे-पिणे सुरू झाले आहे. तिला दोनच दिवसांपूर्वी डिस्चार्ज देण्यात आला आहे. मांसाचे काही नमुने वैद्यकीय तपासणीसाठी अकोल्याच्या शासकीय रुग्णालयाकडे पाठवले असल्याचही राठी यांनी सांगितले.

## पैठण पंढरपूर राष्ट्रीय महामार्गचा अपुरे काम उच्च न्यायालयाच्या आदेशाने देखील पूर्ण झाले नाही

पाटोदा : पैठण पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग(पालखी मार्ग) अपुरे राहिलेले काम उच्च न्यायालयाच्या आदेशने देखील डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण झाले नाही. तसेच मार्च २०२५ मध्ये पाटोदा शहरांमध्ये काम सुरू केले आहे, परंतु रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. अनेक ठिकाणी रोड काँक्रीट मध्ये स्टीलचा वापर केलेला नाही तसेच ज्या ठिकाणी थोडाफार केलेले आहे त्या स्टीलची जाडी अत्यंत कमी आहे दर्जाहीन काम चालू आहे. सदरील ठेकेदार याच्या कामावर प्रशासनाचे नियंत्रण दिसत नाही सदरील ठेकेदार व प्रशासन जनतेवर उपकार केल्यासारखे रोडचे काम करत आहे. तसेच चुंभळी ते डोंगरकिन्ही मार्गावरील घाटाचे काम अद्याप पर्यंत सुरू नाही व अनेक ठिकाणी पैठण ते पंढरपूर पर्यंत अद्याप पर्यंत काम अपूर्णच आहे. त्यामुळे याप्रकरणी १.सचिव रस्ते वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्रालय नवी दिल्ली २.सचिव रेल्वे विभाग नवी दिल्ली ३.सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई ४.कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद ५.मुख्य अभियंता तथा विभागीय अधिकारी राष्ट्रीय महामार्ग ठ.छे. ५०८,५०९ पाचवा मजला कोकण भवन सीबीडी बेलापूर,नवी मु ंबई ६.मूख्य वनसंरक्षक नागपूर महाराष्ट्र ७.उपमुख्य अभियंता मध्य रेल्वे अहमदनगर. यांच्या विरोधात माननीय उच्च न्यायालयामध्ये कॉ.महादेव नागरगोजे, ह. भ. प. रामकृष्ण रंधवे बापू, चक्रपणि जाधव यांच्यामार्फत अवमान याचिका दाखल केलेली असून सदरील याचिकेची सुनावणी १५ एप्रिल २०२५ रोजी होणार आहे. सदरील महामार्गाचे संपूर्ण काम जोपर्यंत कार्यारंभ आदेशाप्रमाणे चांगल्या दर्जाचे होत नाही

बीड/महाराष्ट्र
महाराष्ट्र विशेष वार्ता

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार २५ मार्च २०२५
https://lokaarambh.com


# बीड शहरांतर्गत रस्त्यांची दुरावस्था चाळणी
## झालेल्या रस्त्यांवर अजितदादा अवतरले

बीड । प्रतिनिधी बीड शहरांतर्गत रस्त्यांची दुरावस्था झाली असुन ठिकठिकाणी पडलेले जीवघेणे खड्डे,वाळुमिश्रित खडीचा धुराळा उडत असुन अपघातांची संख्या वाढली असुन चाळणी झालेल्या रस्त्यावरून वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. त्यामुळे बीड शहरातील ११० कोटी रुपयांच्या ४० फुट रूंदीच्या १७ मुख्य रस्त्यांच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत राज्याच्या नगरविकास विभागाकड े वर्षभरापूर्वी पाठविण्यात आलेला प्रस्ताव लालफितीत अडकला असुन त्यास तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा या प्रमुख मागणीसह धुळे ते सोलापूर रस्त्यावरील खड्डे कायमस्वरूपी बुजवुन रखडलेले दुभाजकांचे काम पूर्ण करून साईडपंखे भरण्यात यावेत. बीड ते अहिल्यानगर मार्गाचे काम संथगतीने होत असुन प्रमुख शासकीय कार्यालये असणाऱ्या रस्त्यांवर गर्दी होत असुन जलदगतीने पुर्ण करण्यात यावे या मागण्यांसाठी सामाजिक सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२४ वार सोमवार रोजी वाजता कारंजा टॉवर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगरपरिषद बीड कार्यालय

# आ.सुरेश धस यांचे विरुद्ध गरळ ओकणारे भाऊसाहेब लटपटे यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करा

**वंजारी समाज बांधवांचे आष्टी पोलीस स्टेशन येथे निवेदन; भाऊसाहेब लटपटे यांनी लायकी नुसार बोलावे..असा इशारा**


आष्टी । प्रतिनिधी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री सुरेश रामचंद्र धस यांची बदनामी करणाऱ्या भाऊसाहेब लटपटे यांचे विरुद्ध कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी आष्टी तालुक्यातील वंजारी समाजातील समाज बांधवांनी आष्टी पोलीस स्टेशन येथे एका निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनामध्ये म्हटले आहे की, आष्टी विधानसभा मतदार संघाचे विधानसभा सदस्य आमदार सुरेश धस यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये प्रचंड मतांनी विजय मिळवलेला असूनही राष्ट्र वादी काँग्र ेस पार्टीचे कार्यकर्ते भाऊसाहेब लटपटे त्यांची सतत बदनामी करणारे वक्तव्य करत आहेत त्यांच्याविरुद्ध गरळ ओकत आहेत वास्तविक पाहता भाऊसाहेब लटपटे हेच गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून त्यांचेवर आत्तापर्यंत आष्टी आणि अंभोरा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे नोंदवण्यात आलेले असून त्यांना एका गुन्ह्यामध्ये शिक्षा सुनावण्यात आलेली आहे अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीने आमदार सुरेश धस यांच्यासारख्या लोकप्रतिनिधीवर बिनबुडाचे आरोप करून त्यांची बदनामी करू नये भाऊसाहेब लटपटे यांनी त्यांच्या लायकीप्रमाणे वक्तव्य करावीत भाऊसाहेब लटपटे हे वेळोवेळी यूट्यूब चैनल आणि जमेल त्या ठिकाणी आमदार सुरेश धस यांची बदनामी होईल असे वक्तव्य करत आहेत त्यामुळे त्यांचे विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी भाऊसाहेब लटपटे यांच्या वक्तव्यातून जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे अशा जातीजातीत भांडण लावणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती निवेदन करण्यात आली असून भाऊसाहेब लटपटे यांनी जनतेची कोणती कामे केली आहेत हे सांगावे स्वतः गु ंड प्रवृत्तीचे असून आमदार सुरेश धस यांच्यासारख्या



पाच टर्म आमदार असलेल्या व्यक्तींवर त्यांनी खालच्या पातळीवर जाऊन टीका करावी हे योग्य नाही भाऊसाहेब लटपटे यांनी अगोदर आपला डीएनए तपासला पाहिजे इतक्या खालच्या पातळीवरील टीका करणे हा प्रकार यापुढे खपवून घेतला जाणार नाही भाऊसाहेब लटपटे म्हणजे वंजारी समाज नसून त्यांनीही तसेच समजू नये आष्टी तालुक्यातील वंजारी समाज हा पूर्णपणे आमदार सुरेश धस यांच्या मागे ठाम उभा असून या भागामध्ये केवळ आमदार सुरेश धस यांनी विकास कामे केलेली आहेत त्यामध्ये पाथर्डी सरहद्द ते पाटसरा रस्ता डांबरीकरण कापशी येथील साठवण तलावाची उंची वाढवणे तसेच अनेक गावातील रस्ते शाळा, बांधकामे, अंगणवाडी, बांधकामे अनेक गावचे पाणीपुरवठा योजना ही कामे आमदार सुरेश धस यांनीच केलेली आहे. आजवर यापूर्वी कोणत्याही आमदाराने न केलेली कामे ही आमदार सुरेश धस यांनी केलेले आहेत आणि यापुढे येथे करणार आहेत असा आम्हाला विश्वास असून यामुळे आमदार सुरेश धस यांची बदनामी खपवून घेणार नाहीत हे भाऊसाहेब लटपटे यांनी ध्यानात घ्यावे असा इशाराही त्यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे या समाज बांधवांमध्येआष्टी दूध संघाचे चेअरमन आजिनाथ सानप, दूध संघ माजी चेअरमन दूध एन टी गर्जे, माजी चेअरमन आत्माराम फुंदे, जि. प.सदस्य रावसाहेब शिरसाठ, माजी संचालक भगवान सांगळे, माजी सरपंच उद्धव गर्जे,दिलीप गर्जे, सुंदरलाल गर्जे,आश्रुबा गोल्हार, विठ्ठल गर्जे, बाळासाहेब वणवे, नारायण वनवे,बबन शेकडे,माजी सरपंच काका गर्जे,शेषराव गर्जेफौजी, अक्षय गर्जे, सारूख मामा,एन व्ही नागरगोजे,माणिक दहिफळे, वसंत मिसाळ,मोहन आघाव, इंद्रजीत गर्जे, बबन शेकडे, अशोक मिसाळ, बाळासाहेब बाबूलाल सांगळे, आदीसह आष्टी तालुक्यातील वंजारी समाज बांधवांचा मोठया प्रमाणात समावेश होता.

# एक असेही अनोखे आंदोलन मोहीमेत सहभागी व्हा : रूपाली देशपांडे

गेल्या काही वर्षांत बीड शहराची स्वच्छतेबाबत झालेली दुर्दशा पाहता शहरातील प्रत्येक भागात राहणाऱ्या नागरिकांनी आपापल्या प्रभागातील गलिच्छतेचे फोटो काढून पाठवावे आणि एक असेही अनोखे आंदोलन मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन लेखिका तथा सामाजिक कार्यकर्त्या रूपाली देशपांडे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे. याविषयी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे की, आतापर्यंत अनेक नागरिकांनी बीड शहर स्वच्छतेसाठी खूप निवेदने दिली,अर्ज केले,आंदोलन हि केले परंतु काहीही फरक पडला नाही. सगळे काही जैसे थेच चालू



आहे. लोकांना हि काही फरक पडत नाही. कचरा शेजारी असला तरी चालेल. स्वच्छता अभियान मध्ये आपल्याला या वेळेस एक अनोखे आंदोलन करायचे आहे. यासाठी तुम्हा सर्वांच्या मदतीची अपेक्षा आहे. या आंदोलनात तुम्ही घरबसल्या सहभागी होवू शकता. त्यासाठी कोठेही जाण्या येण्याची गरज नाही. फक्त तुमच्या परिसरातील, गल्लीतील, कचरा कु ंडी म्हणजे जिथे कचरा उघड्यावर पडला आहे, तेथील फक्त फोटो काढू न पाठवायचे आहे. फोटो सोबत तुमच्या परिसराचे नाव लिहून पाठवायचे. बस एवढ ंच करायचं आहे. शहरात राहणाऱ्या नागरिकांनी मनात आणले तर हे आंदोलन खूप मोठ्या स्वरूपाचे होईल. आलेल्या सर्व फोटोंचे संकलन करून सर्व वर्ग एकच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना ते पाठविण्यात येणार आहे तसेच प्रसिद्धी माध्यमातून सुद्धा ते प्रकाशित करण्यात येतील. तरी बीड शहरात राहणाऱ्या सर्व नागरिकांना विनंती कि आपण सर्वांनी या अनोख्या आंदोलनात सहभागी होऊन मोठ्या संख्येने फोटो पाठवावे. फोटो ८८८८९५५५३९ या भ्रमणध्वनी क्रमांकावर पाठवावे. हे आंदोलन आपल्या सर्वांचे आहे. आपल्याला बीड शहर स्वच्छ करायचे आहे. तरी कृपया सर्वांनी गंभीर होऊन या अनोख्या आंदोलनात सहभागी व्हावे. असे आवाहन लेखिका तथा सामाजिक कार्यकर्त्या रुपाली देशपांड े यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते निपाणी

**जवळचा येथे विकासकामांचा शूभारंभ**



गेवराई । प्रतिनिधी गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी विकास कामांचा धडाका सुरू केला असून आज निपाणी जवळका येथे ग्रामपंचायत भवन सभामंडप व पंधराव्या वित्त अयोगातुन पाण्याची टाकी उभारणी या विविध विकास कामांचा शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला. आपण मला विधानसभेत काम करण्याची संधी दिली असून त्या बळावरचयेणाऱ्या पाच वर्षांत गेवराई विधानसभा मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. गेवराई विधानसभा मतदारसंघातील निपाणी जवळका येथे आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते विवीध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये ग्रामपंचायत भवन सभामंडप व पंधराव्या वित्त अयोगातुन पाण्याची टाकी या कामाचा शुभारंभ यावेळी करण्यात आला.

# श्री क्षेत्र दत्त संस्थानचे मठाधिपती श्रीहरी महाराज पवार यांना पितृ शोक

बीड । प्रतिनिधी कोल्हारवाडी फाटा, बार्शी रोड, बीड येथील श्री क्षेत्र दत्त संस्थानचे सर्वेसर्वा श्रीहरी महाराज पवार यांचे वडिल दत्तुबा पवार (आप्पा) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले मृत्युसमयी त्यांचे वय १०८ वर्ष होते. दत्तोबा पवार यांनी दत्तभक्तांनच्या सुखःदुखासाठी आपली अवघी हयात खर्ची घातली.रविवारी सकाळी दत्त संस्थानच्या पाडुरंगने अनंतात विलीन होणे पसंत केले आणि त्यांच्यावर जीवापाड प्रेम करणारे दत्तभक्त व परिवार शोकसागरात बुडू



न गेला.त्यांचे निधन परिवारासाठीच नव्हे, तर दत्तभक्तांनसाठीही कधीही भरून न येणारी हानी आहे. अंत्यसंस्कारासाठी जमलेला समुदाय आप्पांच्या मनाची श्रीमंती सिध्द करत होता; राजकीय, सामाजिक,वारकरी व सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी अंत्यसंस्कारासाठी उपस्थित लावली होती.त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले,दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

# विभागीय आयुक्तांचा अंबाळा येथील आदिवासी बांधवांशी संवाद

विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी कन्नड तालुक्यातील अंबाळा गावाला भेट देऊन आदिवासी बांधवांच्या अडीअडचणी बाबत माहिती जाणून घेत आदिवासी बांधवांसाठीच्या योजना तसेच सोईसुविधांबाबत योग्य त्या उपाय योजना करण्याचे निर्देश दिले. अंबाळा ग्रामस्थांनी गावाचा रस्ता, प्रलंबित वनहक्क दावे, जलजीवन मिशन पाणी पुरवठा योजना, शिक्षण, शाळेसाठी संरक्षण भींत, ग्रामविकास, जन्मप्रमाणपत्र, बिबट्यांचा त्रास आदीं बाबत आपल्या अडचणी मांडल्या, जल जीवन मिशन योजने अंतर्गत पाणीपुरवठा करण्यासोबतच योजना मंजूर असून अर्धा किलोमीटर या ठिकाणी भूमिगत पाईपलाईनचे काम करण्यासाठी वन विभागाची मंजुरी मिळण्याबाबतही चर्चा झाली. तसेच प्रधानमंत्री किसान योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी गतीने काम करावे, अशा सूचना



विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी दिल्या. गावातील आदिवासी बांधव ऊसतोडणीसाठी बाहेरगावी जात असल्याने मुलांचे जन्म वेगवेगळ्या गावात होतात त्यामुळे जन्म नोंदणी करण्यासाठी विलंब होतो. विलंबाने नोंदी घेण्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांना अधिकार असल्यामुळे याबाबतची कारवाई होतानाही विलंब होतो. मुलांना शाळेत प्रवेशासाठी अडचणी निर्माण होतात. याबाबत योग्य त्या उपाययोजना करा, अशा सूचना श्री गावडे यांनी दिल्या.

# मी कुणाल कामराच्या पाठीशी उद्धव ठाकरे स्पष्ट च बोलले



स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक टिका केली आहे. यावरुन सध्या राजकीय वातावरण तापले आहे. आता याप्रकरणी शिवसेना ठाकरे गटाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे यांनी भाष्य केले. कॉमेडिअन कुणाल कामराने सत्य आसलेल्या जनभावना मांडल्या आहेत. जे चोरी करत आहेत, त्यांनी गद्दारी केली आहे. मी कुणाल कामराच्या पाठीशी आहे, असे शिवसेना ठाकरे गटाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी नुकतंच विधानभवनात प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले. यावेळी त्यांना कुणाल कामराबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी थेट प्रतिक्रिया दिली. मी कुणाल कामराच्या पाठीशी आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## राज्य आणि देश तुमच्या हातात आहे तरी दंगल कशी होती?

"कुणाल कामराने काहीही चुकीचे म्हटले असे मला वाटत नाही. कुणाल कामराने सत्य असलेल्या जनभावना मांडल्या आहेत. जे चोरी करत आहेत, त्यांनी गद्दारी केली आहे. मी कुणाल कामराच्या पाठीशी आहे. सुपारी सुपारी काय बोलता? नागपूरच्या दंगलीची सुपारी कोणी दिली होती. औरंगजेबाच्या कबरीची सुपारी कोणी दिली होती? राज्य आणि देश तुमच्या हातात आहे तरी दंगल कशी होती?" असा सवाल उद्धव ठाकरेंनी विचारला.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com